नियमित फौजदारी खटला नं.७०४/२०२२
निशाणी- १८

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- दिपा संतोष भंडारी उर्फ दिपा अनिकेत शिंदे
वयः- २५ वर्षे, धंदाः- गृहिणी
राहणारः- लोणी सय्यद मिरी, ता. आष्टी जि. बीड

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. के. ए. उबाळे यांचेकडूनः-</u>

१. दि. २८/०२/२०२२ रोजी मी माझ्या माहेरी नगर येथे बाळंतपणासाठी आले होते. त्यावेळी माझे पती लोणी सय्यद मिरी, येथे होते. त्यादिवशी माझे पती इंस्टाग्राम पाहत असताना माझे नावाचे अकांऊट deepa__01_01 व दुसरे अकांऊट deepz_z01 त्यांना दिसले. माझ्या deepz_z01 या अकांऊटवर त्यांना माझा फोटो व चार पोस्ट दिसल्या. माझ्या पतीने मला फोन करुन सदर अकांऊट माझेच आहे का असे विचारले. मी त्यांना सदर अकांऊट माझे नसल्याचे सांगितले. माझे पती नगरला माझ्याकडे आले. त्यांनी पुन्हा सदर अकांऊट माझे आहे का असे विचारणा केली असता मी त्यांना नाही असे सांगितले. मग आम्ही सायबर पोलीसांकडे तक्रार देण्यासाठी गेलो. तेथे आम्ही तक्रार दिली. मला दाखविलेली तक्रार तीच आहे त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. फिर्यादला <u>नि.१९</u> देण्यात येते.

२. त्यानंतर दि. २५/०३/२०२२ रोजी आम्ही पुन्हा सायबर पोलीस स्टेशन येथे चौकशी करण्यासाठी गेलो. पोलीसांनी आम्हाला सदर अकांऊटचा मोबाईल क्र. ८८४७७५६६५० सांगितला. सदर क्रमांक मोबाईलवर सर्च केला असता तो माझ्या कॉलेजमधील मैत्रीण इशा जाधव हिचा असल्याचे समजले. तिने माझ्या नावाने खोटे अकांऊट उघडुन तिने माझ्या नव-याला शिवीगाळ केली होती. मी आरोपीला ओळखते, ती आज न्यायालयात हजर आहे. मी सायबर पोलीस सटेशनला तक्रार अर्ज दिला होता तो अर्ज मला दाखविल्यास तो मी ओळखु शकते. तो अर्ज तोच आहे, त्यास <u>नि. २०</u> देण्यात येते. सदर तक्रार अर्जासोबत मी स्क्रीन शॉट दिले होते. मला दाखविण्यात आलेले दोन स्क्रीन शॉट तेच आहेत

त्यास वस्तु क्र. ए१ आणि ए२ देण्यात येत आहे. प्रथम खबर अहवालावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.२१ देण्यात येते.

उलट तपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. आर. गायकवाड यांचेकडूनः-

३. हे म्हणणे खरे आहे की, इशा जाधव माझी मैत्रीण आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही डिसोजा क्लासेसमध्ये टयुशनला तसेच न्यु आर्टस कॉलेजला सोबत होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही काही दिवसांकरिता आयटी पार्क मध्ये सोबत नोकरी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, तेथे काम करताना माझे व आरोपीचे किरकोळ कारणावरुन वाद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अकांऊट आरोपीने तयार केले असा मला संशय होता.

४. मी स्वतः इंस्टाग्राम वापरते. हे म्हणणे खरे नाही की, सदर दोन्ही डयुप्लीकेट अकांऊट मी पाहिले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन बनावट अकांऊट माझ्या पतीला दिसले. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बीडला असल्यामुळे सदर अकांऊट होते किंवा नव्हते याची मला माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर अकांऊटवर झालेली चॅटींग मी पोलिसांना दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अकांऊटवर काय शिवीगाळ झाली याचा मी उल्लेख तक्रारमध्ये केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, स्क्रीन शॉट कुठल्या तारखेला काढलेत ती तारिख त्यावर नमुद नाही, तसेच त्यावर काय चॅटींग झाली हे सुध्दा दिसत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सायबर पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रार अर्जामध्ये सदर अकांउटचे नाव deepz_z01 व dhoni_2000 असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सायबर पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रार अर्जात बनावट अकांऊट deepa_01_01 हे नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर बनावट अकांऊट कोठे व कधी तयार केले याबाबत माझ्या फिर्यादमध्ये उल्लेख नाही. माझे शिक्षण बी. कॉम पर्यत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नगरमध्ये राहत असलेल्या ठिकाणापासुन तोफखाना पोलीस स्टेशन व सायबर पोलीस स्टेशन १० मिनीटाच्या अंतरावर आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या पतीमध्ये चॅटिंग चालते असा मला संशय असल्यामुळे मी सदरची तक्रार केली. हे म्हणणे खरे नाही की ,वरिल दोन्ही

अकांऊट आरोपीने तयार केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे अकांऊट आरोपीने तयार केल्याचा मला संशय असल्याने मी तिच्या विरुध्द तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, कामावर असताना आरोपीचे व माझे वाद झाल्यामुळे तसेच माझ्या पतीचे तिच्या सोबत चॅटिंग चालते असा संशय असलयाने मी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, वरिल अकांऊट कोणी तयार केले याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.09.29 16:59:23 +0530

(एल.एस.पाढेण)

दि.२९/०९/२०२५

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.